महाराष्ट्र शासन
# उपवनसंरक्षक, पुसद वन विभाग, पुसद यांचे कार्यालय
'वनभवन' मुख्य पोस्ट ऑफीसजवळ, तहसिल कार्यालय रोड . पुसद-445204 जि. यवतमाळ
☎ 07233- 248809 दूरध्वनी dyclpsd@yahoo.in./ dycfpusad@mahaforest.gov.in

**आदेश क्रमांक :-** 154 **दिनांक:- ३१ ऑगस्ट, २०२४**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन राजपत्र, सामान्य प्रशासन विभाग, शासन अध्यादेश दिनांक २९/०८/२०२४.

-oUo-

शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या कलम ४ (२), ४ (४) मधील तरतुदी नुसार तसेच महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक एफएसटी-१२/१७/प्र.क्र.६६४/फ-४, दिनांक ११/०१/२०१८ अन्वये, प्राप्त शक्तीचा वापर करुन, दिनांक ३१/०८/२०२४ रोजी झालेली नागरी सेवा मंडळाच्या बैठकीतील केलेल्या शिफारशीस संदर्भीय पत्रान्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने **लेखापाल** या संवर्गातील कर्मचा-यांचे विभागातंर्गत बदली व पदस्थापना पुढील प्रमाणे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पदावर **प्रशासकीय** कारणास्तव करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लेखपालांचे नांव | कार्यरत ठिकाण | पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती सविता सुनिल मिश्रा, | लेखापाल विभागीय कार्यालय पुसद वनविभाग | लेखापाल, वनपरिक्षेत्र कार्यालय (प्रादे.) महागांव | श्री.तिलेवाड, लेखापाल यांचे बदलीने रिक्त पदी. |
| २ | श्री.हनवता नथ्थुजी तिलेवाड, | लेखापाल, वनपरिक्षेत्र कार्यालय (प्रादे.) महागांव | लेखापाल विभागीय कार्यालय पुसद वनविभाग | श्रीमती मिश्रा, लेखापाल यांचे बदलीने रिक्त पदी. |

**२.००** पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होईपर्यंत संबंधित कर्मचा-यांना या कार्यालयाच्या पुर्व परवानगी शिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजुर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील ३० (सी) नुसार मुळ कार्यालयाने बदली झालेल्या कर्मचा-यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत.असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित कर्मचा-यांना नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मुळ कार्यालयाकडे बदली झालेल्या कर्मचा-यांचे रजेचे अर्ज पाठविल्यास अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

**३.००** सदरहू बदली आदेशानुसार संबंधित कर्मचारी तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारे असल्यामुळे, ती गैरवर्तणूक असुन, त्यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**४.००** सदर आदेश तात्काळ प्रभावाने लागू होतील. वरील प्रमाणे आदेशाची अमंलबजावणी करुन, अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Deputy Conservator of Forest, Pusad Division, Pusad

(डॉ.बि.एन.स्वामी)
उपवनसंरक्षक,
पुसद वनविभाग,पुसद

क्र.कक्ष-९/आस्था/प्र.क्र.१७/१७९४ /२०२४-२५
पुसद ४४५ २०४ दिनांक ३१ ऑगस्ट, २०२४
प्रति,

वरील प्रमाणे लेखापाल **मार्फत:-** संबंधीत अधिकारी

**प्रतिलीपी :-** मा.वनसंरक्षक, (प्रादे.) यवतमाळ यांना माहितीस सविनय सादर.
**प्रतिलीपी :-** वनक्षेत्रपाल (प्रादे.) महागांव यांना माहिती तथा उचित कार्यवाही करीता रवाना.
**प्रतिलीपी :- आदेश फाईल/बदली नस्ती-२०२४-२५.**



CamScanner